नि.फौज केस क्र. ३७९/२०२१
निशाणी क्र. ३८

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -

माझे नांव – श्रीकृष्ण सखाराम अंभोरे,

वय सुमारे - ६० वर्षे व्यवसाय - शेती

राहणार – - शेलगांव आटोळ, चिखली ता. बुलढाणा

जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी समाधान पवार न्यायालयात हजर नाही व बाकी आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. मी समाधान पवार याला पाहिल्यास ओळखू शकतो. फिर्यादी हा माझा भाचा आहे. घटना दि. ०५.०७.२०२१ रोजी रात्री ०९.०० वाजता आरोपीच्या घरासमोरील रोडवर घडली होती. त्यावेळी व माझे नातेवाईक माझे घरी बसलेले होतो. मला भांडणाचा आवाज आल्याने मी घराबाहेर येवून पाहिले असता सर्व आरोपी हे फिर्यादीला मारहाण करीत होते. त्यानंतर मी गजानन गोंड, अवीनाश गोंड आम्ही भांडण सोडविण्यासाठी गेलो. मला लक्ष्मण पवार, समाधान पवार, निवृत्ती पवार यांनी मला लाथा बुक्यांनी व काठयांनी मारहाण केली. त्यामुळे मला डाव्या बरगडीवर, डोक्यावर व डाव्यास हातावर मार लागला होता. सर्व आरोपी गजानन गोंड, अविनाश गोंड व फिर्यादी यांना लाथा बुक्यांनी व काठीने मारहाण केली त्यामुळे गजानन गोंड याचे डोक्यातून रक्त निघत होते. आरोपी व फिर्यादीमध्ये शेतीच्या रस्त्याच्या कारणावरुन भांडण झाले होते. त्यानंतर फिर्यादीने आरोपी विरुद्ध अंढेरा पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट दिला होता. पोलिसांनी आम्हाला उपचारासाठी अंढेरा येथील सरकारी दवाखान्यात पाठविले व त्यानंतर बुलडाणा येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठविले. आरोपींनी मला जीवे मारण्याची धमकी दिली होती.

०२ साक्षीदारास ओपी.क्र. ६५/२०२५ वरील मटेरीअल ऑब्जेक्ट १ वरील काठया दाखविण्यात आल्या. आरोपिंनी त्याला अविनाश गोंड, गजानन गोंड व फिर्यादीला ज्या काठयांनी मारहाण केली होती त्या हयाच काठया असल्याचे साक्षीदाराने सांगीतले. पोलिसांनी माझे बयाण माझे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. टि.ए. शेख  यांचेतर्फे</u>

०३.   फिर्यादी व आरोपी माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादीमध्ये शेतीच्या रस्त्याच्या कारणावरुन वाद चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांचे न्यायालयात शेतीच्या कारणावरुन दिवाणी दावे सुरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी पावसाचे दिवस होते. आरोपीच्या घराच्या शेजारी लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेलगांव अटोळ येथे पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष व सरपंच आहे. हे म्हणणे खरे आहे की, रात्री ०९.०० वाजणेच्या दरम्यान सर्व लोक आपआपल्या घरी असतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरासमोरील रस्ता हा मुख्य रस्ता असून तो रहदारीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्तयावरुन वाहने चालतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणावरुन आरोपींनी माझे विरुद्ध फौजदारी प्रकरण दाखल केले  असून ते न्यायप्रविष्ट आहे. हे म्हणणे खरे आहे की, काठयांवर रक्ताचे निशाण नाही.

०४.   हे म्हणणे खरे नाही की,  आरोपींनी मला काठयांनी बरगडीवर व डाव्या हातावर मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,  आरोपींनी माझे विरुद्च्या केसेस मागे घ्याव्यात  म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. फिर्यादी हा ऑटोचालक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मानसिक व शारीरिक त्रास देण्यासाठी मी आरोपी विरुद्ध खोटे प्रकरण दाखल केले असून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास  नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.01.06 14:54:47 +0530

( श्रीमती एस.एच. उके )

दि. ०५.०१.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.

नि.फौज केस क्र. ३७९/२०२१
निशाणी क्र. ३३

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – संजय प्रल्हाद बांबल
वय सुमारे - ४६ वर्षे व्यवसाय - चालक
राहणार – - शेलगांव आटोळ, चिखली ता. बुलढाणा
जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी समाधान पवार, निवृत्ती पवार, सुभाष पवार, सचिन पवार आज न्यायालयात हजर आहे. मी बाकीचे आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. घटना हि दि. ०५.०७.२०२१ रोजी शांताराम गावडे यांच्या घरासमोर रात्री ९.०० वा. घडली. मी शेतातून घरी परत चाललो होतो. सर्व आरोपी तेथे आले व मला अडवले. आरोपींनी मला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपी समाधान लक्ष्मण पवार, सुभाष सदाशिव पवार याने मला काठीने छातीवर, डाव्या पायावर, डाव्या हातावर मारले होते. त्यावेळी माझा भाचा अविनाश गुंड, पवन श्रीकृष्ण अंभोरे हे मला सोडवण्यासाठी आले. आरोपींनी पवन श्रीकृष्ण अंभोरे याला बेशुध्द होई पर्यंत काठीने मारहाण केली. माझा मुलगा गणेश याला आरोपींनी पायावर व डोक्यावर काठीने मारले होते. श्रीकृष्ण सखाराम अंभोरे यांना सर्व आरोपींनी काठीने पायावर, हातावर मारले होते. त्यानंतर मी अंढेरा पो.स्टेशन येथे जावून आरोपी विरुध्द रिपोर्ट दिला.

०२. आता मला अभिलेखावरील रिपोर्ट दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३५** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझे बयाण नोंदवले नव्होते. पोलीसांनी मला त्यानंतर उपचारासाठी दवाखान्यात पाठवले होते. अंढेरा येथून आम्हाला देऊळगांवमही तेथून बुलढाणा येथे शासकीय रुगणालयात पाठवण्यात आले. फिर्यादीला ओ.पी. क्र. ६५/२०२५ वरील काठया दाखवण्यात आल्या. आरोपीने त्याला, त्याच्या मुलाला व श्रीकृष्ण अंभोरे, पवन अंभोरे यांना ज्या काठयांनी मारले होते हे त्याच काठया असल्याचे त्याने सांगीतले. त्यास एकत्रीतरित्या **मटेरियल ऑब्जेक्ट ०१** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. टि.ए. शेख यांचेतर्फे</u>**

०३. मी प्रवासी वाहतूक करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये शेतीचा वाद सुरु आहे आणि तो वाद या घटनेपूर्वी पासून सुरु आहे. घटनेपूर्वी आरोपींनी माझे विरुध्द कलम १०७ नुसार पोलीस व्दारे कार्यवाही कोली होती. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार साहेब यांनी आमच्याकडून चांगले वागणूकीचे बॉड लिहून घेतले. शेलगांव आटोळ ते माझे शेताचे अंतर २ कि.मी. एवढे आहे. घटनेच्या आजूबाजूला दोन्ही बाजूने वस्ती आहे. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, मला सोडवण्यासाठी गणेश आला होता, गणेश यास आरोपींनी लाठया काठयांनी मारहाण करुन पायावर, डोक्यावर मारहाण केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्टमध्ये पोलीसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेलगांव आटोळ ते अंढेरा येण्यासाठी १५ ते २० मिनिट एवढा वेळ लागते. शेलगांव आटोळ येथे सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष आहे. मी सरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष यांना घटनेबद्दल तोंडी किंवा लिखीत सांगीतले नव्होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दि.०६.०७.२०२१ रोजी लेखी रिपोर्ट पोलीसांना दिला. तो रिपोर्ट जयसिंग राठोड यांनी तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, लेखी रिपोर्ट ज्यांनी तयार करुन दिला त्यावर त्याची सही नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी पावसाळयाचे दिवस होते. हे म्हणणे खरे आहे की, पावसाळयाच्या दिवसात ग्रामीण भागात सर्व जण आपआपल्या घरी असतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस आजूबाजूचे लोक त्यांची घरी होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्यावर दाखल केलेल्या केसेस वापस घ्याव्या म्हणून मी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझ्या मुलाला, श्रीकृष्ण अंभोरे यांना लाठी काठीने मारहाण करुन जखमी केले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, पाच आरोपींनी पवनला काठीने बेशुध्द होईपर्यंत मारहाण केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्ट मध्ये का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी श्रीकृष्ण अंभोरेला पायावर, हातावर व डोक्यावर मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझ्या मुलाला व श्रीकृष्ण अंभोरेला लाठया काठयांनी

मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. काठयांना कोठे रक्त लागलेले दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या नातेवाईकांनी जुन्या वादाच्या कारणावरुन आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास  नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

( श्रीमती एस.एच. उके )

दि. २०.११.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.